112/88

# कार्यालय,नागपूर महानगरपालिका,नागपूर


सामान्य प्रशासन विभाग
१ ला मजला,नविन प्रशासकिय इमारत,महानगरपालिका मार्ग,
सिव्हील लाईन, नागपूर-४४०००१
दुरध्वनी क्र.०७१२-२५६७०३२/१८३
(ईमेल gadnmcnagpur@gmail.com)


पत्र क्र. : - साप्रवि/वि.स.ता/४४/२०२३ दिनांक :-१८/१२/२०२३

**विधानमंडळ कामकाज/ कालमर्यादा /अति-तातडीचे**

प्रति,

१) मा.अधिक्षक अभियंता
सार्व.आ.अभि. विभाग
महानगरपालिका नागपूर.

कालमर्यादा

२) मा.प्रभारी मुख्य अग्निशमन अधिकारी
अग्निशमन विभाग
महानगरपालिका नागपूर.

विषय :- **महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये लक्षवेधी सुचना क्र. ६६० .**
**"मुंबई, पुणे, छत्रपती संभाजी नगर, नागपूर, नाशिक आणि राज्यातील अन्य मोठ्या शहरात अनधिकृत रुफटॉप हॉटेल्सची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली असणे, या हॉटेल्समध्ये विनापरवाना हुक्का पार्लर आणि पब सुरू असून ड्रगचा पुरवठा व सेवन केले जात असणे, अग्निसुरक्षाविषयक उपाययोजनांच्या अभावामुळे जीवितास धोका निर्माण झाला असणे, यापूर्वी हॉटेल आगीच्या घटना मुंबई, पुण्यात घडल्या असणे, महापालिका, अग्निशमन, राज्य उत्पादन शुल्क, आरोग्य विभाग आणि पोलीस दलामधील भ्रष्ट अधिकाऱ्यांमुळे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असणे, रात्री उशिरापर्यंत रुफटॉप हॉटेल्समधील आवाज, गोंगाट आणि राड्यामुळे सर्वसामान्यांचे जिणे त्रासदायक झाले असणे, अशा हॉटेल्समध्ये गुंड प्रवृत्तीच्या लोकांचा वावर वाढला असणे, इमारतीची गच्ची सामुदायिक मालकीची असताना व्यावसायिक कारणासाठी रुफटॉप हॉटेल्सला परवानगी दिली असणे, मुंबई महापालिकेने लोकप्रतिनिधींना डावलून आयुक्तांच्या अधिकारात धोरण तयार केले असणे, यास शासनाची मान्यता नसणे, रूफटॉप हॉटेलबाबत सर्व राज्यासाठी धोरण तयार करावे, सध्याची सर्व रूफटॉप हॉटेल बंद करावीत, अशी मागणी लोकप्रतिनिधींनी पत्रान्वये शासनास केली असणे, तथापि, शासनाचे याकडे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी जनतेच्या जीविताचा व कायदा व सुवस्थेचा निर्माण झालेला प्रश्न, शासनाने केलेली कार्यवाही व प्रतिक्रिया".**

संदर्भ :- क्र.५७१६३४१/फ महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय विधान भवन,नागपूर दि.१८.१२.२०२३.

महोदय,

उपरोक्त संदर्भांकित विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, **"महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये लक्षवेधी(५७१६३४१) सुचना क्र. .याबाबत मा. श्री.विजय वडेट्टीवार,श्री.सुनिल कांबळे , मा.विधानसभा सदस्य** यांनी उपस्थित केले असुन त्याअनुषंगाने आपल्या विभागाशी संबंधित विषय आपणाकडे पाठविण्यात येत आहे. करीता स्वयंस्पष्ट अहवाल, पुरक टिप्पणीसह मुद्देनिहाय माहिती ud२०.urban-mh@mah.gov.in व vidya.hampayya@nic.in शासनाच्या संकेतस्थळावर तात्काळ पाठवण्यात यावी, तसेच पाठवण्यात येणाऱ्या उत्तराची एक प्रत gadnmcnagpur@gmail.com या ईमेलवर प्रत तसेच सॉफ्ट (पेन्ड्रॉव्ह) व हाड कॉपी मध्ये सुलभ माहितीसाठी या कार्यालयास पाठविण्याची विनंती आहे.

सहपत्र :- संदर्भिय पत्र

18/12/23

सहा.अधिक्षक
सामान्य प्रशासन विभाग
महानगरपालिका नागपूर

प्रतिलीपी :-

१) मा. उपायुक्त, साप्रवि, म.न.पा. नागपूर यांना माहितीस्तव सादर.
२) मा. सहा. आयुक्त साप्रवि, म.न.पा. नागपूर यांना माहितीस्तव सादर.

# नागपूर महानगरपालिका, नागपूर

**अग्निशमन व आपात्कालीन सेवा विभाग**

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय भवन, महानगरपालिका, सिव्हील लाईन्स, नागपूर

(फोन नं. **०७१२-२५६२३१६**) email-dfo.nmcngr@gov.in


क्र. NMC/FIRE/OWL/२०२३-२४/ 33239 दिनांक: 19/12/2023

प्रति,

मा. अधिक्षक अभियंता
सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग
महानगरपालिका नागपूर

विषय :- महाराष्ट्र विधानसभा नियम -१०५ अन्वये लक्षवेधी सुचना

संदर्भ :- पत्र क्र. साप्रवि/वि.स.ता./४४/२०२३ /दि. १८/१२/२०२३ अन्वये.

महोदय,

उपरोक्त विषयाचे संदर्भांकित पत्रान्वये, मा. श्री विजय वडेट्टीवार व मा. श्री. सुनिल कांबळे विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम -१०५ अन्वये लक्षवेधी सुचना उपस्थित केलेली आहे.

त्याअनुषंगाने शासनास लक्षवेधी सुचनेबाबत अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभागातर्फे यथास्थिती टिपणी या पत्रासोबत संलग्न करून संयुक्तीक अहवाल सादर करण्यास पाठविण्यात येत आहे.

AC-GAD

बी.पी.चंदनखेडे
प्र. मुख्य अग्निशमन अधिकारी
म.न.पा. नागपूर

प्रतिलीपी :-

मा. उपायुक्त, सामान्य प्रशासन विभाग
महानगरपालिका नागपूर

21/12/23

# नागपूर महानगरपालिका, नागपूर

**अग्निशमन व आपात्कालीन सेवा विभाग**

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय भवन, महानगरपालिका, सिव्हील लाईन्स, नागपूर

(फोन नं. ०७१२-२५६२३१६) email-dfo.nmcngr@gov.in


## -: टिपणी :-

विषय :- महाराष्ट्र विधानसभा नियम -१०५ अन्वये लक्षवेधी सुचना

संदर्भ :- पत्र क्र. साप्रवि/वि.स.ता./४४/२०२३ /दि. १८/१२/२०२३ अन्वये.

महोदय,

मा. श्री विजय वडेट्टीवार व मा. श्री. सुनिल कांबळे विधानसभा सदस्य यांनी खालील प्रमाणे महाराष्ट्र विधानसभा नियम -१०५ अन्वये लक्षवेधी सुचना उपस्थित केलेली आहे.

**"मुंबई, पूणे, छत्रपती संभाजी नगर, नागपूर, नाशिक आणि राज्यातील अन्य मोठया शहरात अनधिकृत रुफटॉप हॉटेल्सची संख्या मोठया प्रमाणात वाढली असणे, या हॉटेल्समध्ये विनापरवाना हुक्का पार्लर पब सुरु असुन ड्रगचा पुरवठा व सेवन केले जात असणे,अग्निसुरक्षाविषयक उपाययोजनांच्या अभावामुळे जिवितास धोका निर्माण झाला असणे, यापूर्वी हॉटेल आगीच्या घटना मुंबई, पूण्यात घडल्या असणे, महापालिका, अग्निशमन, राज्य उत्पादन शुल्क, आरोग्य विभाग आणि पोलीस दलामधील भ्रष्ट अधिका-यांमुळे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असणे, रात्री उशीरापर्यंत रुफटॉप हॉटेल्समधील आवाज, गोंगाट आणि राड्यामुळे सर्वसामान्यांचे जिणे त्रासदायक झाले असणे, अशा हॉटेल्समध्ये गुंड प्रवृतीच् या लोकांचा वावर वाढला असणे, इमारतीची गच्ची सामुदायीक मालकीची असताना व्यावसायीक कारणासाठी रुफटॉप हॉटेल्सला परवानगी दिली असणे, मुंबई महापालिकेने लोकप्रतिनिधींना डावलुन आयुक्तांच्या अधिकारात धोरण तयार केले असणे, यास शासनाची मान्यता नसणे, रुफटॉप हॉटेलबाबत सर्व राज्यासाठी धोरण तयार करावे. सध्याची सर्व रुफटॉप हॉटेल बंद करावीत, अशी मागणी लोकप्रतिनिधींनी पत्रान्वये शासनास केली असणे, तथापी, शासनाचे याकडे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी जनतेच्या जिविताचा व कायदा व सुव्यवस्थेचा निर्माण झालेला प्रश्न, शासनाने केलेली कार्यवाही व प्रतिक्रिया".**

अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभागातर्फे करण्यात आलेल्या निरीक्षणा दरम्यान नागपूर शहरात रामदासपेठ, छावनी, अमरावती रोड, धरमपेठ, कॉटन मार्केट इत्यादी परिसरात अनधिकृत एकुण २२ रुफटॉप रेस्टॉरेंट असल्याचे निदर्शनास आले होते.

सदर रुफटॉप रेस्टॉरेंटला अग्निशमन विभागाची कोणत्याही प्रकारची परवानगी नसतांना तसेच मंजूरी विरूध्द वापर तथा बाहेर पडण्याचे पर्याप्त मार्ग/जीने उपलब्ध नसतांना सुरू असल्याचे व अग्निशमन साहित्य तथा उपकरणांची पुर्तता केली नसल्याने मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही असे निदर्शनास आल्याने एकूण २२ इमारतीवर महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ (२००७) अंतर्गत कार्यवाही करण्यात आलेली आहे ते खालीलप्रमाणे.

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ (२००७) च्या कलम ६ अन्वये एकूण २२ रुफटॉप रेस्टॉरेंट विरुध्द कारवाई करण्यात आली. त्यापैकी कलम ८(१) अन्वये एकुण १४, कलम ८(२) क अन्वये एकुण ०५ व कलम ३६ अन्वये ०१ रुफटॉप इमारतीवर कारवाई करण्यात आलेली असून एकूण १५ रुफटॉप रेस्टॉरेंट नोटिस कारवाई करून बंद करण्यात आलेले आहे. तसेच ०१ रुफटॉप रेस्टॉरेंट यांनी सक्षम प्राधिकरणाची मंजूरी प्राप्त केलेली आहे.

नागपूर शहरात सध्यास्थितीत अस्तीत्वात असलेल्या २१ रुफटॉप रेस्टॉरेंट इमारतींना सक्षम प्राधिकरणाची मंजूरी तथा अग्निशमान विभागाची परवानगी नसतांनाही अनधिकृतपणे सुरू असल्याने मा. सहा. संचालक, नगर रचना विभाग यांना पत्राद्वारे अनधिकृत बांधकाम काढण्याबाबत कळविण्यात आले आहे.

त्याचप्रमाणे वेगवेगळया व्यवसायाचे परवाना/ नुतनीकरण/ नोंदणी करते वेळेस त्या व्यवसायाच्या वापराप्रमाणे इमारतीचे बांधकामाची मंजूरी व अग्निशमन विभागाची मंजुरी असल्याची खात्री करुनच मान्यता देण्याबाबत मा.पोलीस आयुक्त्, नागपूर शहर मा. मुख्य् अधिक्षक, अबकारी विभाग व मा. सहा आयुक्त् , अन्न् व औषध प्रशासन विभाग यांना मा. आयुक्त्, महानगरपालिका नागपूर यांनी पत्राद्वारे सुचित केले आहे. अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभागामार्फत महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक अधिनियम २००६ अन्वये व महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक सुधारीत अधिनियम २०२३ अन्वये निरंतर कार्यवाही सुरू आहे. **(प्रत संलग्न्)**

बी.पी.चंदनखेडे
प्र. मुख्य अग्निशमन अधिकारी
म.न.पा. नागपूर